SUPPLEMENT

TO THE

# BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

WEDNESDAY, 19TH FEBRUARY 1862.

## PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council, assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern :—

*15th February* 1862.

The Council of His Excellency the Governor in Council met for the purpose of making Laws and Regulations according to adjournment.

*PRESENT:—*

THE HONORABLE MR. REEVES,
THE HONORABLE MR. FRERE,
THE HONORABLE MR. WESTROPP,
THE HONORABLE MR. TRISTRAM,
THE HONORABLE THE NAWAB OF SAVANOOR,
THE HONORABLE MR. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY,
THE HONORABLE MR. MADHOOROW VITTUL VINCHOORKUR,
THE HONORABLE MR. JUGGONATH SUNKERSETT,
THE HONORABLE MR. PREMABHAI HEMABHAI,
And the SECRETARY.

The HONORABLE MR. REEVES, being the Senior Ordinary Member of Council present, presided in the absence of the Governor.

The HONORABLE MR. REEVES, with reference to the subject which stands first on the paper, asked the Honorable MR. WESTROPP to favour the Council with his promised observations on the letter from the Government of India referring to the Rules of the Council.

The Honorable Mr. Westropp said the Secretary had furnished him with copies of the rules of the former Legislative Council, as well as the rules enacted by the Governor General for the business of his Council when assembled for the purpose of making laws and regulations. He considered that the rules of the late Council were too intricate for adoption here, but that the Rules of the present Council of the Governor General would answer well. He had no doubt that the appointment of Select Committees to consider all Bills introduced into the Council was necessary, and he would propose that any Honorable Member desirous to introduce a Bill should apply for leave in the first instance, stating its objects and the necessity for its being passed. He might at the same time propose that the Bill should be read a first time. The Bill should then be discussed in Council, and if leave be granted to introduce it, and if it be read a first time, the Bill should be referred to a Select Committee, and printed and published. The Committee should be directed to report on it after a certain date, to be fixed according to the nature of the Bill, a longer or shorter period being allotted as may be considered necessary. The period should not always be limited to the present Session, but might be fixed after the close of the Session or at some time in the next Sessions, so as to give time to the public to express an opinion.

In the case of Bills of less importance the Committee's report might be made due during the sitting of Council.

If measures are passed with too great rapidity, he feared that they will not stand the test of practice in the Courts of Justice, and he was therefore anxious that no undue haste should take place in passing any Bill.

Before a Bill is read a second time it should again be discussed, and, if necessary, amended in a Committee of the whole Council, without any recommittal to a special Committee, and on being twice read it should be passed by the Council and entrusted to an Honorable Member of the Executive Council for the purpose of being submitted to His Excellency the Governor for his assent.

This plan he proposed was in entire accordance with the rules for the Council of the Governor General, and he would therefore suggest that those rules beginning at No. 14, and as far as No. 27, should be adopted by this Council.

The Honorable Mr. Reeves thought that Bills introduced by Government should be brought forward without going through the form of requiring the leave of the Council. But a Bill originated by any individual member should not be introduced without the leave of Council. With this exception he approved of Mr. Westropp's propositions, and would order the Secretary to prepare a draft of Rules in accordance therewith.

The Honorable Mr. Westropp doubted the necessity of giving Government any preference in this matter, but he expressed his willingness, with the Secretary's assistance, to prepare a draft of Rules for consideration at next meeting.

*Agreed to.*

The Honorable Mr. Frere stated that he had altered and amended the Bill for bringing under the Regulations and Acts certain lands ceded by His Highness the Guicowar for Railway purposes, which he proceeded to read as amended.

*A Bill for bringing under the Regulations and Acts certain lands ceded by His Highness the Guicowar for Railway purposes.*

Preamble.

Whereas His Highness the Guicowar has ceded to the Government of India certain lands for the construction of a Railway through his Territories, and it is necessary that those lands should be annexed to the Presidency of Bombay and made subject to the Laws and Regulations of that Presidency, it is enacted as follows:—

I. All such parts of Villages mentioned in the Schedule annexed to this Act as have been delivered over by His Highness the Guicowar to the Government of India for the construction of the Bombay, Baroda, and Central India Railway shall, from and after the passing of this Act, form part of the Zillah of Surat, and be subject to the Regulations and Acts which are or shall be in force within the Territories subject to the Presidency of Bombay.

## SCHEDULE.

| | |
|---|---|
| *Baroda Purgunnah.* | 27 Bajwa. |
| 1 Hulderwa. | 28 Kurchia. |
| 2 Tosrod. | 29 Runnolee. |
| 3 Wullun. | 30 Puddumla. |
| 4 Dethan (Inamee). | 31 Nundesree. |
| 5 Lakodra. | 32 Fazulpoor (up the river Mahee). |
| 6 Wurwa. | *Surat Attauwsee Purgunnah.* |
| 7 Meeagaum. | 33 Sukhpoor-oorf Rond, Purgunnah Gullet. |
| 8 Kurjun. | 34 Pellotha, Purgunnah Wesranee. |
| 9 Kundaree. | 35 Choowacha, ditto ditto. |
| 10 Kairda. | 36 Koosoomha ditto ditto. |
| 11 Surar (Inamee). | 37 Tursalee ditto ditto. |
| 12 Kassipoora. | 38 Hatoorun ditto ditto. |
| 13 Etola. | 39 Wurrudla ditto ditto. |
| 14 Wursula. | 40 Murolee Kusha. |
| 15 Wurnama. | 41 Posra, Purgunnah Morolee. |
| 16 Dulleepoor. | 42 Morwar, Purgunnah Telaree. |
| 17 Maritha. | 43 Chinum, ditto ditto. |
| 18 Manaja | 44 Tuvree, ditto ditto. |
| 19 Wursur (Inamee). | 45 Nowsaree Kusha. |
| 20 Mazulpoor (Inamee). | 46 Sagura, Purgunnah Nowsaree (Inamee). |
| 21 Nagurwarra. | 47 Kudolee, ditto ditto ditto. |
| 22 Akota. | 48 Danoda, Purgunnah Gundavee. |
| 23 Jetulpoor. | 49 Billimora, ditto ditto. |
| 24 Gorwa. | 50 Desra, ditto ditto. |
| 25 Kurodia. | |
| 26 Oondera. | |

The Honorable Member proposed that the Bill, as amended, should now be printed, and that it should be considered at the next meeting of Council.

The Honorable Mr. Westropp observed that the preamble of the Bill says, that the cession has been made to the Government of India and not to the Government of Bombay,— it may therefore be a question how far we have power to legislate for these lands.

The Honorable Mr. Frere observed that at the time this cession was made, the Political relations with His Highness the Guicowar were under the Government of India, and that they have since been replaced under the Government of Bombay. He thought, therefore, that as the Bill could not become law till approved by the Governor General in Council, the objection taken by the Honorable and learned Member would have but little force.

The Bill, as amended by the Honorable Mr. Frere, was therefore ordered to be printed.

The Honorable Mr. Reeves proposed that the Secretary shall read the amended Bill for extending the powers of Municipal Commissioners appointed under Act XXVI. of 1850, which has been submitted by the Select Committee.

The Secretary read the Bill accordingly :—

Whereas by Act XXVI. of 1850 it was enacted that the Taxes raised from the inhabitants of any Town or Suburb under the said Act should be applied to the making, repairing, cleaning, lighting or watching, any public streets, roads, drains, or tanks, or to the prevention of nuisances, or for improving the said Town or Suburb in any other manner ;

And whereas it is expedient that, in addition to the above purposes, the Commissioners appointed for putting the said Act in force should be authorized to apply the said Taxes to the construction and support of Dispensaries, Hospitals, Schools, and other similar works of utility to the inhabitants of the said Town or Suburb ;

And whereas it is also expedient that the Governor in Council should have power to enforce the right and just appropriation of the Taxes raised under the said Act for the benefit of the Community paying the same ;

It is hereby enacted that the Taxes raised under Act XXVI. of 1850 are and shall be applicable to the construction, support, and maintenance of any Hospital, Dispensary,

School, or similar work of public utility; and it shall be competent to the Commissioners appointed under the said Act to expend the said Taxes to the extent of not more than 25 per cent. of the annual revenues of the Municipality for the purpose of such last mentioned works with the approval of the Governor in Council.

And it is further enacted that, whenever it shall have been ascertained by the Governor in Council, through the Commissioner of Police or Magistrate, and other person or persons appointed by the Governor in Council to inquire and report, that the Commissioners appointed under the said Act in any locality have neglected any necessary work, act, or duty, it shall be lawful for the Governor in Council to issue an order to the said Commissioners to execute such work, act, or duty; and if that order shall not be obeyed within one week from the date of its issue, it shall further be lawful for the Governor in Council to order the Commissioner of Police, or the Magistrate, to execute the said necessary work, act, or duty, and to recover the expense thereof from the Municipal Funds; and in failure of immediate payment of the said expenses by the Municipal Commissioners, it shall be lawful for the Governor in Council to make the said Commissioners, collectively and individually, personally responsible for payment of such expenses, in the manner laid down in Section 9 of the said Act, as for money due to, and at the suit of, Her Majesty's Secretary of State for India in Council.

The Honorable Mr. Reeves said that he would be inclined to omit the words "act or duty" in the last Section: he thought the word "work" would be sufficient, but he would leave this point for discussion at the next Meeting. In the meantime he proposed that the Bill should be printed and circulated, and that its further consideration should be postponed till the next Meeting.

*Agreed to.*

The Honorable Mr. Reeves observed that the next Bill which he would submit, is one to amend Act XI. of 1843 by Section 4 of which the approval of Government was necessary for certain appointments to Hereditary Offices. This has been found to be very inconvenient, as the Local Officers are well acquainted with the circumstances of each case, and able to dispose of them: it has resulted in a long list of all such appointments being sent up at the end of each year for the formal approval of Government, and this approval is granted as a matter of course, as there are no data before Government whereon to form a disapproval.

This Bill was read by the Secretary:—

Whereas it is desirable that the Government of Bombay should be empowered to depute authority to the Revenue and Police Commissioners of sanctioning the term for which a sharer in a Wuttun nominated under Section 4 of Act XI. of 1843 shall hold office, and of approving of selections made by the Collector or Controlling Officer under the same Section;

It is hereby enacted that the words "*or Revenue Commissioner when authorized by Government*" shall be inserted after the words "with the sanction of the Governor in Council" in Section 4 of Act XI. of 1843, and that the words "*or Revenue Commissioner when authorized by Government*" shall be added after the words "to the approval of the Governor in Council" at the end of the said Section, and that the words so inserted shall be taken as part of the said fourth Section of Act XI. of 1843.

It was ordered that it should be printed and circulated to the Honorable Members and considered at the next Meeting.

*Agreed to.*

The Honorable Mr. Frere said that he had to introduce a Bill for extending the Jurisdiction of the Native Subordinate Civil Courts to the same as that exercised by similar Courts on the other side of India.

The Bill was read by the Secretary.

Whereas it is deemed expedient to enlarge the Appellate Jurisdiction of Principal Sudder Ameens, to lessen the pecuniary jurisdiction of Sudder Ameens and Moonsiffs, and to invest Moonsiffs with a final jurisdiction in certain cases: It is therefore enacted as follows:—

I. In extension of the provisions of Regulation XVIII. of 1831, Section 3, Clause 1, it shall be lawful for the Zillah Judge to refer for trial appeals from original decisions passed by Sudder Ameens or Moonsiffs in any District of the Bombay Presidency, to the Principal Sudder Ameen of such District, without restriction as to the amount in dispute.

II. In modification of Clause 2, Section 3, of the aforesaid Regulation, it is hereby provided that Sudder Ameens shall be authorized to try suits to the amount of Rs. 1,000 only, and Moonsiffs to the amount of Rs. 300 only.

III. In all suits of the nature described in Act XLII. of 1860, Section 3, in which the debt, damage, or demand does not exceed in amount or value Rs. 20, the decisions and orders of the Moonsiff trying the same shall be final.

It was ordered to be printed and circulated and considered at next Meeting.

*Agreed to.*

The HONORABLE MR. TRISTRAM referred to the Rules of the Council, and thought that 11 o'clock A.M. should be the hour of meeting instead of 1 o'clock P.M.

The HONORABLE MR. JUGGONNATH SUNKERSETT thought that 1 o'clock would be more convenient to the majority of the Members.

The HONORABLE MR. REEVES informed the Council that His Excellency the Governor is opposed to the alteration of the hour of meeting to 1 o'clock, and that His Excellency thought the hour of meeting should be fixed at 11.

The HONORABLE MR. MADHOOROW VITTUL VINCHOORKUR considered that so long as the rule stands as it is, the Council should meet at 11, and that no other hour for meeting should be fixed until the rule be altered.

The HONORABLE PRESIDENT then adjourned the meeting till Saturday, 22nd instant, at 11 A.M.

*By order of His Excellency the Governor of Bombay in Council,*

M. J. SHAW STEWART,

Acting Secretary to Government.

*Bombay Castle*, 15*th February* 1862.

कायदे व कानूं करण्यासाठीं बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत आनरबल गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्या वेळीं काम चाललें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिध्ध केला आहे.

शनवार तारीख १५ वी माहे फेब्रूआरी सन १८६२.

कायदे व कानूं करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्याप्रमाणें आज पुनः भरली.

हजर.

आनरबल रीवझ साहेब.
आनरबल फ्रीयर साहेब.
आनरबल वेस्रूप साहेब.
आनरबल ट्रिस्रूम साहेब.
आनरबल नवाब साहेब सावनूर येथील.
आनरबल रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल रावबाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर.
आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेब.
आणि सेक्रेटारी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबर हजर होते त्यांपैकीं आनरबल रीवझ साहेब सिनियर असल्यामुळें ते गवरनर साहेब आले नव्हते सबब प्रेसिडेंट झाले.

कौन्सिलांत गुजारविण्यासाठीं तयार केलेले कागदांत प्रथम जें प्रकरण लिहिलें होतें त्याविषयीं आनरबल रीवझ साहेब, आनरबल वेस्रूप साहेबांस असें ह्मणाले कीं कौन्सिलाचे नियमा प्रकरणीं इंडिया सरकाराकडून आलेले पत्राबाबद तुह्मी आपला विच्यार कळविण्याचें कबूल केलें होतें तो आतां मेहरबानी करून कौन्सिलास कळवावा.

मग आनरबल वेस्रूप साहेब ह्मणाले कीं पूर्वींचे लेजिस्लेटिव कौन्सिलाचे नियमांची प्रत आणि गवरनर जनरल यांणीं कायदे व कानूं करण्यासाठीं आपलें कौन्सिल भरेल तेव्हां काम कसें चालवावें याविषयीं नियम ठरविले आहेत त्यांची प्रत सेक्रेटारी साहेबानी आह्माकडे पाठविली आहे. त्या प्रती पाहातां पूर्वींचे कौन्सिलाचे नियम येथें चालविण्यास फार अवघड पडेल परंतु गवरनर जनरलांचे हाल्लींचे कौन्सिलाचे नीट पडतील असें आह्मास वाटतें. कौन्सिलांत गुजारलेले सर्व आक्टांचे मसुद्यांचा विच्यार करण्यासाठीं सिलेक्ट कमिटी नेमणें अवश्य आहे याविषयीं आह्मास कांहीं अंदेशा नाहीं त्यास आमचें असें ह्मणणें आहे कीं ज्या आनरबल मेंबराची आक्टाचा मसुदा गुजारण्याची इच्छा असेल त्याणें तो गुजारण्याविषयीं प्रथम परवानगी मागावी आणि तो आक्ट करण्याचे हेतु काय आहेत तेव आक्ट ठरविण्याची काय जरूरी आहे ती जाहीर करावी आणि तो आक्टाचा मसुदा पहिले वेळीं वाचावा असें ह्मणण्याचा त्यास अधिकार आहे. मग त्या मसुद्याबाबद कौन्सिलानी वादविवाद करावा आणि तो मसुदा गुजारण्याची परवानगी दिली व तो पहिले वेळीं वाचला तर तो सिलेक्ट

कमिटी कडे सोंपावा व छापून प्रसिद्ध करावा. मसुद्याचे स्वरूपाप्रमाणे मुदत ठरवून त्या मुदती नंतर त्याबाबद रिपोर्ट करण्याविषयीं कमिटीस सांगावें. मुदत ठरविणें ती जरूर असेल त्या प्रमाणे फार किंवा थोडकी ठरवावी. सदर्हू मुदत चालू सेशनामध्येंच संपे अशी नेहमी ठरवूं नये, सेशन सरल्यावर संपेल किंवा पुढले सेशनांत कोणतेही वेळीं संपेल अशी ठरवावी ह्मणजे त्या मसुद्याविषयीं लोकांस आपले विच्यार जाहीर करण्यास वेळ मिळे अशे रीतीनें ठरवावी. मोठे अगत्याचे मसुदे नसतील त्यांविषयीं कमिटीने रिपोर्ट करणें तो कौन्सिलाचे सेशनाचे मुदतींत करावा असें ठरवावें.

कायदे लौकर लौकर ठरविले तर ते इनसाफाचेकोर्टांत चालू झाले ह्मणजे त्यांचा टिकाव होणार नाहीं असें आह्मास वाटतें यास्तव आमची अशी इच्छा आहे कीं मसुदा कायम करण्यांत उगीच उतावेळ करूं नये.

कोणताही मसुदा दुसरे वेळीं वाचल्यापूर्वीं त्याविषयीं पुनः वादविवाद करावा आणि सिलेक्ट कमिटीकडे पुनः न सोंपतां जरूर असेल तर सगळे कौन्सिलाचे कमिटींत तो सुधारावा. आणि तो दोनदां वाचल्यावर कौन्सिलानें कायम करावा. व आलीज्या गवरनर साहेबांचे मंजुरीसाठीं त्यांकडे गुजारण्याकरितां एक्सिक्युटिव कौन्सिलाचे एका आनरबल् मेंबराचे स्वाधीन तो करावा.

ह्या जो मार्ग आह्मी सांगितला तो गवरनर जनरल् इन् कौन्सिलाचे नियमांस अगदीं बरोबर आहे याजकरितां आमचें असें ह्मणणें आहे कीं या कौन्सिलाने त्या नियमां पैकीं १४ वे नंबरापासून २७ वे नंबरा पर्यंतचे नियम येथें चालू करावे.

आनरबल् रीवज साहेब ह्मणाले कीं आक्टाचे मसुदे कौन्सिलांत गुजारण्यासाठीं कौन्सिलाची परवानगी मागण्याची रीत आक्टाचे मसुदे सरकारांतून गुजारण्यांत येतील त्यांस लागू नसावी. कोणी मेंबरानें तयार केलेला मसुदा कौन्सिलाचे परवानगी वांचून गुजारण्यांत येऊं नये. या गोष्टी खेरीज आनरबल वेस्रॉप साहेबांचें ह्मणणें आह्मास मंजूर आहे आणि त्या प्रमाणे नियमांचा मसुदा तयार करण्याविषयीं सेक्रेटारी साहेबांस आह्मी हुकूम करतों.

यावर आनरबल् वेस्रॉप साहेब ह्मणाले कीं आक्टाचे मसुदे गुजारण्याविषयीं परवानगी घेण्याची रीत आहे ती सरकारांतून आलेले आक्टाचे मसुद्यास लागू न करण्याची जरूरी आमचे नजरेस येत नाहीं परंतु नियमांचा मसुदा पुढल्या सभेस विच्यार होण्यासाठीं सेक्रेटारी साहेबांचे मदतीनें तयार करण्यास आह्मी सिद्ध आहों.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं गायकवाड सरकारानी लोखंडी सडकेचे कामासाठीं कांहीं जमिनी दिल्या आहेत त्यांस कायदे व आक्ट लागू करण्याविषयींचे आक्टाच्या मसुदा कंपेश करून आह्मी सुधारला आहे तो येणे प्रमाणेः—

## गायकवाड सरकारानी लोखंडी सडकेचे कामासाठीं कांहीं जमिनी दिल्या आहेत त्यांस कायदे व आक्ट लागू करण्याविषयींचे आक्टाचा मसुदा.

उद्देश. गायकवाड सरकारानी आपले मुलुकांतून लोखंडी सडक बांधण्यासाठीं कांहीं जमिनी इंडिया सरकारांस दिल्या आहेत आणि त्या जमिनी मुंबई प्रेसिडेन्सींत दाखल करून त्यांस

त्या प्रेसिडेन्सीचे कायदे व कानू लागू करणें योग्य आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणें ठरविलें आहे:-

१. या आक्टास जोडलेले परिशिष्टांत गांव लिहिले आहेत त्या गांवांचे जे भाग गायकवाड सरकारानी मुंबई व बडोदें व सेंट्रल इंडिया रेलवे या नावाची लोखंडी सडक बांधण्यासाठीं इंडिया सरकारास दिले आहेत ते सर्व भाग हा आक्ट ठरल्याचे तारिखेपासून सुरत जिल्ह्याचे भाग आहेत असें समजावें, आणि मुंबई प्रेसिडेन्सीचे ताब्यांतील मुलकांत जे कायदे व आक्ट चालू आहेत किंवा पुढें चालू होतील ते कायदे व आक्ट त्यांस लागू आहेत असें समजावें.

# परिशिष्ट.

## परगणे बडोदें.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | हलदरवा. | १७ | मारीठा. |
| २ | तासराड. | १८ | मानाजा. |
| ३ | वलण. | १९ | वरसड. (इनामी.) |
| ४ | देथाण. (इनामी.) | २० | माजलपूर. (इनामी.) |
| ५ | कालोद्रा. | २१ | नागरवाडा. |
| ६ | वर्चा. | २२ | अकोटा. |
| ७ | मीयागांव. | २३ | जेतलपूर. |
| ८ | कुर्ज्यण. | २४ | गोरवा. |
| ९ | कंडारी. | २५ | कडोदिया. |
| १० | केरडा. | २६ | उंदेडा. |
| ११ | सराड. (इनामी.) | २७ | बाजवा. |
| १२ | कासीपुरा. | २८ | कर्चीया. |
| १३ | इटोला. | २९ | रनोली. |
| १४ | वर्सेला. | ३० | पदमला. |
| १५ | वर्नामा. | ३१ | नंदेसरी. |
| १६ | दलीपूर. | ३२ | फाजलपूर. (महीनदी पर्यंत.) |

## परगणे सुरत अठ्ठाविशी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | सुरबपूर ऊर्फ रोंद | परगणे चळां. | ४२ | मोवाड, | परगणे तेलाडी. |
| ३४ | पिलोथा, | परगणे वसवारी. | ४३ | चिनम, | कित्ता कित्ता. |
| ३५ | चुंवाच्या, | कित्ता कित्ता. | ४४ | तवडी, | कित्ता कित्ता. |
| ३६ | कुसुंबा, | कित्ता कित्ता. | ४५ | कसबे नौसारी. | |
| ३७ | तरसाली, | कित्ता कित्ता. | ४६ | सागडा, | परगणे नौसारी (इनामी.) |
| ३८ | अथुरण, | कित्ता कित्ता. | ४७ | कडोली, | कित्ता कित्ता. (इनामी.) |
| ३९ | वरदला, | कित्ता कित्ता. | ४८ | दावेडा, | परगणे घणदेवी. |
| ४० | कसबे मरोली. | | ४९ | विल्ली मोरा, | कित्ता कित्ता. |
| ४१ | पोंसरा, | परगणे मरोली. | ५० | देसरा, | कित्ता कित्ता. |

नंतर आनरबल फीयर साहेब ह्मणाले कीं हा सुधारलेला आक्टाचा मसुदा आतां छापावा व त्या विषयीं कौन्सिलाचे पुढले सभेंत विच्यार करावा.

आनरबल वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं जमिनी दिल्या त्या इंडिया सरकारास दिल्या आहेत मुंबई सरकारास दिल्या नाहींत असें मसुद्याचे उद्देशांत लिहिलें आहे, तेव्हां त्या जमिनीं विषयीं कायदे ठरविण्याचा आपणास अधिकार कितपत आहे ही तकरारीची गोष्ट आहे.

यावर आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं जमिनी दिल्या त्यावेळीं गायकवाड सरकाराचा राजकीय संबंध इंडिया सरकाराबरोबर होता परंतु आतां तो संबंध पुनः मुंबई सरकाराशीं झाला आहे आणि गवरनर जनरल इन् कौन्सिलानी मसुदा मंजूर केल्यावांचून कायदा ठरत नाहीं तेव्हां आनरबल वेस्ट्राप साहेबानी घेतलेली हरकत फारशी नाहीं.

यास्तव आनरबल फ्रीयर साहेबानी सुधारलेला आक्टाचा मसुदा छापण्याविषयीं हुकूम झाला.

मग आनरबल रीवझ साहेब ह्मणाले कीं सन १८५०चे २६ वे आक्टा अन्वयें नेमलेले म्युनिसिपल कमिशनरांचे अधिकार वाढविण्याविषयींचे आक्टाचा सुधारलेला मसुदा सिलेक्ट कमिटी कडून आला आहे तो सेक्रेटारी साहेबानी वाचावा.

कोणतेही गांवांत किंवा गांवा बाहेरील वस्तींत राहाणारे लोकां जवळून सन १८५० चे २६ वे आक्टा अन्वयें कर घेतील त्याचा ऐवज त्या गांवांतील किंवा गांवा बाहरचे वस्तींतील रस्ते किंवा मोऱ्या किंवा तळीं बांधण्याकडे किंवा त्यांची मरामत करण्याकडे किंवा स्वछ करण्याकडे किंवा तेथें दिवे लावण्याकडे किंवा त्यांचें संरक्षण करण्याकडे सदहू आक्टा अन्वयें खर्च करावा, अथवा कोणताही उपद्रव न होई असा बंदोबस्त करण्याकडे खर्च करावा अथवा गांव किंवा बाहेरील वस्ती इतर रितीने सुधारण्याकडे खर्च करावा असा ठराव सदहू आक्टांत आहे यास्तव.

आणि सदहू आक्ट अमलांत आणण्यासाठीं नेमलेले कमिशनरांस सदहू कामा खेरीज आणखी खालीं लिहिलेले कामाकडे ह्मणजे दवाखाने व इस्पिटालें व शाळा व गांवांत किंवा गांवा बाहेरील वस्तींत राहाणारांचे उपयोगी तशींच इतर कामे करून त्यांचा खर्च चालविण्याकडे सदहू कर घेतील त्यांचा ऐवज खर्च करण्याचा अधिकार देणे योग्य आहे यास्तव.

आणि सदहू आक्टावरून घेतलेले करांचा ऐवज कर देणारे लोकांचे हितासाठीं योग्य व वाजवी रितीने खर्च करविण्याचा अधिकार गवरनर इन् कौन्सिलास असावा हें योग्य आहे.

यास्तव असें ठरविलें आहे कीं सन १८५० चे २६ वे आक्टा अन्वयें घेतलेले करांचा ऐवज इस्पिटालें किंवा दवाखाने किंवा शाळा किंवा तशीं लोकोपयोगी इतर कामें बांधण्याकडे किंवा त्यांचा खर्च चालविण्याकडे लावावा आणि सदहू करांचा ऐवज दरसाल वसूल होईल त्याचे चतुर्थांशा पर्यंत ऐवज गवरनर इन् कौन्सिलाची मंजुरी घेऊन सदहू कामाकडे खर्च करण्याचा अधिकार, सदहू आक्टावरून नेमलेले कमिशनरांस आहे.

आणखी असें ठरविलें आहे कीं सदहू आक्टावरून कोणतेही ठिकाणीं नेमलेले कमिशनरानीं अमुक जरूरीचें काम किंवा कृत्य किंवा कर्म करण्यास हयगय केली आहे असें पोलीस कमिशनरां कडून किंवा माजिस्ट्रेटा कडून आणि चौकशी करून रिपोर्ट करण्याविषयीं ज्या इतर मनुष्यास किंवा मनुष्यांस गवरनर इन् कौन्सिलाने नेमले असतील त्यां मनुष्यांकडून गवरनर इन् कौन्सिलास जाहीर होईल तेव्हां तें काम किंवा कृत्य किंवा कर्म करण्याविषयीं सदहू कमिशनरांस हुकूम

करण्याचा अधिकार गवरनर इन् कोंन्सिलास आहे. आणि तो हुकूम झाल्याचे तारिखे पासून एका आठवड्याचे आंत मान्य न केला तर सदर्हू जरूरीचें काम किंवा कृत्य किंवा कर्म करून त्याचा खर्च म्युनिसिपल् फंडांतून वसूल करण्याचा हुकूम पोलीस कमिशनरास किंवा माजिस्ट्रेटास करण्याचा अधिकारही गवरनर इन् कोंन्सिलास आहे. आणि सदर्हू खर्च म्युनिसिपल् कमिशनरानी तात्काळ न दिला तर सदर्हू आक्टाचे ९ वे कलमांत सांगितल्या प्रमाणे तो खर्चाचा ऐवज खालीं लिहिलेले गेन्जा प्रमाणे म्हणजे मलिकामाआझमाचे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटारी इन् कोंन्सिलास देण्याचे ऐवजा प्रमाणे व त्याचे फिर्यादी वरून देण्याची जबाबदारी सदर्हू सर्व कमिशनरांकडे व प्रत्येकाकडे जातीने आहे असें ठरविण्याचा अधिकार गवरनर इन् कोंन्सिलास आहे.

आनरेबल् रीवझ् साहेब म्हणाले कीं शेवटले कलमांत कृत्य किंवा कर्म हे शब्द आहेत ते गाळावे. कामं या शब्दाने निर्वाह होईल असें आमचे नजरेस येतें. परंतु पुढले सभेस या विषयीं विच्यार करूं. आतां आमचें असें म्हणणे आहे कीं हा मसुदा छापून सर्वांकडे पाठवावा व त्याचा आणखी विच्यार करण्याचें काम पुढले सभे पर्यंत तहकूब ठेवावें.

ही गोष्ट सर्वांनीं कबूल केली.

नंतर आनरबल् रीवझ साहेब म्हणाले कीं आमचे मनांत आतां सन१८४३ चा ११ वाआक्ट सुधारण्या विषयींचे आक्टाचा मसुदा गुजारण्याचा आहे. त्या आक्टाचे ४ थे कलमाअन्वयें वतनदार लोकांच्या नेमणुका सरकारांतून मंजूर झाल्या पाहिजेत, यामुळें फार आडचण पडते. जिल्ह्यांतील अंमलदारांस चांगली माहिती असल्यामुळें त्यांस चांगल्या नेमणुका करतां येतात परंतु सदर्हू कलमावरून हाल्लीं दर वर्षाचे अखेरीस सदर्हू प्रकारचे सर्व नेमणुकांची एक लांब यादी सरकारची उगीच नावाची मात्र मंजुरी घेण्यासाठीं पाठवावी लागते आणि त्या नेमणुका नामंजूर करण्याविषयीं कांहीं साधन नसल्यामुळें सरकारास त्या मंजूरच कराव्या लागतात.

हा आक्टाचा मसुदा सेक्रेटरी साहेबांनी [illegible]

सन १८४३ चे ११ वे आक्टाचे ४ थे कलमाअन्वयें नेमलेले हिस्सेदारानें वतनाचें काम किती मुद्दत पर्यंत करावें हें मंजूर करण्याचा अधिकार, आणि कलेक्टरानें किंवा मुख्य अधिकाऱ्यानें त्याच कलमावरून कोणी मनुष्याची नेमणूक केली असेल ती मंजूर करण्याचा अधिकार रेवेन्यु कमिशनरांस व पोलीस कमिशनरांस देण्याचा अखत्यार मुंबई सरकारास देणें योग्य आहे

यास्तव असें ठरविलें आहे कीं "सन १८४३ चे ११ वे आक्टाचे ४ थे कलमांत गवरनर इन् कौन्सिलाची आज्ञा घेऊन" हे शब्द आहेत त्या शब्दांपुढें "किंवा सरकाराने अधिकार दिला असेल तेव्हां रेवेन्यु कमिशनराची आज्ञा घेऊन" हे शब्द वाढवावे; आणि "गवरनर कौन्सिलानीं खचित केला पाहिजे" हे शब्द सदर्हू कलमाचे शेवटीं लिहिले आहेत त्या शब्दांपुढें "किंवा सरकाराने अधिकार दिला असेल तेव्हां रेवेन्यु कमिशनराचे खचित केला पाहिजे" हे शब्द वाढवावे; आणि सदर्हू प्रमाणे वाढविलेले शब्द सन १८४३ चे ११ वे आक्टाचे ४ थे कलमाचे भाग आहेत असें समजून त्यांचा अर्थ करावा.

नंतर हा मसुदा छापून आनरबल् मेंबरांकडे पाठवावा व त्याचा पुढले सभेस विचार करावा असा हुकूम झाला.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

आनरबल् फ्रीयर साहेब म्हणाले कीं प्रिन्सिपल सदर अमीन व सदर अमीन व मुनसीफ यांचे कोर्टास हिंदुस्थानाचे इतर भागांत जी हुकुमत आहे त्याप्रमाणे या प्रेसिडेन्सींतील तसेच कोर्टास आणखी हुकुमत देण्याविषयींचे आक्टाचा मसुदा आह्मास गुजारण्याचा आहे.

नंतर सेक्रेटारी साहेबानी तो मसुदा वाचला, तो येणेप्रमाणे.

अपिलें घेण्याची प्रिन्सिपल सदर अमीनास हुकुमत आहे ती वाढविणे योग्य आहे आणि सदर अमीनास व मुनसीफांस जितके रुपयां पर्यंत अवल मुकद्मे तपासण्याचा अधिकार आहे त्यांहून कमी रुपयांचे त्यांणी मुकद्मे तपासावे असा त्यांचा अधिकार कमी करणे योग्य आहे, आणि कित्येक बाबतींत आखरचा फेसला करण्याचा अधिकार मुनसीफांस देणे योग्य आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणे ठरविलें आहे.

१ सन १८३१ चे १८ वे कायद्याचे ३ रे कलमाचे १ ले रकमेंतील ठराव बाढवून असें ठरविलें आहे कीं मुंबई प्रेसिडेन्सीचे कोणतेही जिल्ह्यांत सदर अमीनानीं किंवा मुनसीफांनी केलेले अवल निवाड्यांवरील अपिलें इनसाफ करण्यासाठीं त्या जिल्ह्याचे प्रिन्सिपल सदर अमीनाकडे पाठविण्याचा अधिकार जिल्हे जज्यास आहे. दाव्याची रकम कित्तीही असली तरी चिंता नाहीं.

२ सदहू कायद्याचे ३ रे कलमाची २ री रकम फिरवून असें ठरविलें आहे कीं एक हजार रुपयां पर्यंतचे मुकद्म्याचा इनसाफ करण्याचा अधिकार सदर अमीनास आहे आणि ३०० रुपयां पर्यंतचे मुकद्म्याचा मात्र इनसाफ करण्याचा अधिकार मुनसीफांस आहे.

३ सन १८६० चे ४२ वे आक्टाचे ३ रे कलमांत सांगितलेले प्रकारचे मुकद्म्यांत कर्जाची किंवा नुकसानीची किंवा दाव्याची रकम २० रुपयांवर नसेल तेव्हां त्या मुकद्म्याचा इनसाफ करणारे मुनसीफांचे फैसले व हुकूम आखरचे आहेत असें समजावें.

हा आक्टाचा मसुदा छापून सर्वांकडे पाठवावा व त्याविषयीं पुढले सभेंत विचार करावा असा हुकूम झाला.

आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब कौन्सिलाचे नियम पाहून ह्मणाले कीं सभा प्रातःकाळचे ११ वाजतां भरली पाहिजे बारांवर एक वाजतां भरूं नये.

यावर आनरबल जगन्नाथ शंकरशेट साहेब ह्मणाले कीं आनरबल् मेंबरांपैकीं बहुतेकांस बारांवर एक वाजतां येण्याची वेळ अधिक सोईवार होईल.

आनरबल् रीवझ साहेबानीं कौन्सिलास असें जाहीर केलें कीं सभा भरण्याची वेळ बदलून ती बारांवर एक वाजतां भरण्याची ठरावी या गोष्टीस आलीज्याह गवरनर साहेबांची हरकत आहे. सभा भरण्याची वेळ ११ वाजतां ठरावी असें त्यांचें ह्मणणे आहे.

यावर आनरबल् रावबाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर ह्मणाले कीं नियम कायम आहेत तोंपर्यंत कौंसिलाची सभा ११ वाजतां भरली पाहिजे आणि नियमांत फेरफार होई तों पर्यंत सभा भरण्याचा दुसरा वेळ ठरवूं नये.

नंतर तारीख २२ वी शनवारचे प्रातःकाळचे ११ वरां पर्यंत कौन्सिल तहकूब ह्मणून आनरबल् प्रेसीडेंट साहेबानीं सांगितलें.

बमुजिबे हुकूम बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत
आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल

मुक्काम बंदिरे मुंबई,
तारीख १५ वी माहे फेब्रुआरी सन १८६२.

मैक्येल जान शा स्ट्युवर्ट साहेब.
आक्टिंग सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

(True translation)

VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.